भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ११०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १५/०२/२०१७

१) संगनमत करुन ट्रक मध्ये जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद :-

दिनांक १३/०२/२०१७ चे २३.३० वा. दरम्यान. यातील चारही आरोपीतांनी संगनमत करुन त्यांच्या ताब्यातील कंटेनर ट्रक क्र. एमएच ४६ एआर १११५ मध्ये एकुण ४० प्राणी (२ म्हैशी, ३८ हेले ) व कंटेनर क्र. एमएच २० डीई ६११६ मध्ये ३९ प्राणी (४ हैशी, ३५ हेले) क्षमते पेक्षा जास्त प्राणी कोंबुन भरुन त्यांना निदर्यतेने वागणुक दिले त्यांचे सुरक्षीततेची कोणतीही काळजी न घेता वाहतुक करतांनी मिळुन आल्याने आरोपीतांच्या ताब्यातुन २ कंटेनर ट्रक व प्राणी असा एकुण किंमती २७,२५,०००/—रु. चा माल मिळुन आल्याने पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २८९,३४ भांदवी. सहकलम ११(१)(ड)प्रा.नि.वा.का. सहकलम ९ प्रा. स. का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. रामटेके पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

२) क्षुल्लक कारणावरुन कैचीने मारहान करुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक १३/०२/२०१७ चे १३.३० वा. दरम्यान. यातील जखमी फिर्यादी आकाश रामनाथ थोटे वय १६ वर्ष, रा. राजेदहेगाव हा क्रिकेट खेळण्याच्या मैदानावर आरोपीचे आई सोबत बोलत असतांना यातील आरोपीने आपल्या हातात कैची घेवुन पाठीमागे येवुन फिर्यादीचे पाठीवर मारुन जखमी केल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३२४ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. इळपाते पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

३) डोक्यावर विटाने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक १४/०२/२०१७ चे १९.३० वा. दरम्यान. यातील फिर्यादीची पत्नी सौ. शामकला हीने येवढे पैसे घेवुन जातोस त्याचे काय करतो असे मोठयाने बोलले असता यातील आरोपी हा घरातुन धावत येऊन तु मला असा का बोलला असे बोलुन हातात विट धरुन फिर्यादीचे डोक्यावर व फिर्यादीचे पत्नीला विटाने मारुन जखमी केल्याने फिर्यादी यशवंत तुळशीराम मडावी वय ६१ वर्ष, रा. ब्रम्ही यांचे बयाण व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३२४ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. बिसने पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

४) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—

दिनांक १४/०२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली ७६ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०१, तीन सिटर वाहनांवरती ०७ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ७८ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

15.2

(एस. व्ही. कुलकर्णी )
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.